सूत्रसंचालनही तिने केलं. *चोरावर मोर* या कांचन अधिकारी यांच्या मालिकेत भूमिका साकारली. शशांक सोळंकींच्या *पेप्सोडंट सुपरमॉम* या मालिकेच्या २० भागांसाठी सहाय्यक दिग्दर्शक म्हणून काम केलं. दरम्यानच्या काळात *सब टीव्हीवरच्या बंदा ये बिंधास्त है* या मालिकेचं सूत्रसंचालन केलं. अशोक कार्लेकर, राजू फुंडकर यांच्या *व्हीसीडीसाठी* केलेल्या कार्यक्रमात भूमिका केली.

'हे सगळं सुरू होतं. थोडे पैसेही मिळायचे. पण मोठं यश मिळत नव्हतं. महिन्यातले फक्त पाच-सहा दिवस काम असायचं. बाकी सगळे दिवस रिकामे जायचे. त्यामुळे *डिप्रेशन* यायला लागलं. भूक लागेना. एकटं एकटं वाटायला लागलं. सातारा मुंबईपासून बरंच लांब. त्यामुळे पटकन घरी जाता यायचं नाही. बाबांनाही काळजी वाटायची. आता काहीतरी निर्णय घेणं भाग होतं,' चैताली सांगत होती. तिची अवस्था इतर स्ट्रगलर्सपेक्षा फारशी वेगळी नव्हती. अखेर २००५मध्ये मुंबईतला बाडबिस्तारा गुंडाळून चैताली सरळ पुण्यात आली आणि *पंडित ऑटोत* नोकरी करायला सुरुवात केली. नोकरी करताकरता बाबांबरोबर *गंमत-जंमतचे* प्रयोग सुरू होतेच. नंतर तिने *प्लॅनेट फोर्डच्या* विक्री विभागात काम करायला सुरुवात केली. पण आर्थिक मंदीमुळे डिसेंबरमध्ये नोकरी सोडणं चैतालीला भाग पडलं. दरम्यानच्या काळात लग्नं झालं.

हे सगळं वेगाने सुरू असताना चैतालीतला कलाकार तिला स्वस्थ बसू देत नव्हता. *गंमत-जंमतचे* प्रयोग सुरू होतेच. त्याशिवाय किस्से, नकलांचे एकपात्री प्रयोगही ती करायला लागली. एकपात्री कार्यक्रमांच्या परिषदेची ती सदस्य आहे. या परिषदेच्या मकरंद टिल्लू यांनी तिच्यासमोर *गेम शोची* कल्पना मांडली. या कल्पनेवर तिने मेहनत घ्यायला सुरुवात केली आणि अपेक्षेपेक्षाही मोठा प्रतिसाद तिला मिळाला.

चैताली म्हणते, 'आपल्या रोजच्या आयुष्यात घडणाऱ्या काही घटना आयुष्यभर स्मृतीत जतन केल्या जातात. हे प्रसंग साजरे करण्याच्या प्रत्येकाच्या कल्पना वेगळ्या असतात. मात्र हे क्षण सगळ्यांनी एकत्र धमाल साजरे करायचे असतील, तर *गेम शोला* पर्याय नाही. त्यात सर्व वयोगटांतली माणसं सहभागी होऊ शकतात. वेगवेगळे मनोरंजक खेळ खेळताना वयाचाही विसर पडतो. कल्पनाशक्तीला वाव मिळतो, नवी माहिती मिळते, ज्ञानात भर पडते.'

*टीव्हीने* लोकप्रिय केलेला *गेम शो* हा प्रकार चैतालीने घराघरांत प्रत्यक्ष पोहोचवला आहे. या



हास्यसम्राटमध्ये पुरुष कलाकारांच्या बरोबरीने चैतालीनेही आपली दखल घ्यायला लावली.

*गेम शोच्या* निमित्ताने तिचे पुण्या-मुंबईसह अहमदनगर, वाई, सातारा, कोल्हापूरसारख्या ठिकाणी सतत दौरे सुरू असतात. सूत्रसंचालन आणि निवेदनाच्या कार्यशाळेवरही ती सध्या मेहनत घेत आहे. वडिलांच्या मदतीने ती या दोन दिवसांच्या कार्यशाळा आयोजित करते. या कार्यशाळांमध्ये अगदी लहानलहान गावांमधूनही विद्यार्थी शिकायला येतात. त्यात ओंकार साधना, स्टेजवर बोलायचं कसं, वावरायचं कसं, आवाजाचे चढ-उतार यासंबंधीचं मार्गदर्शन केलं जातं. याच दरम्यान *झी मराठीच्या हास्यसम्राट* या कार्यक्रमात तिने भाग घेतला आणि ती उपांत्य फेरीपर्यंत पोहोचली.

विनोदी किस्से, नकला यांचा हा न संपणारा खजिना चैताली मिळवते कुठून? त्याविषयी चैताली सांगते, 'आजूबाजूच्या माणसांचं निरीक्षण हा याचा सगळ्यात मोठा स्रोत आहे. नकला करायची मला लहानपणापासूनच सवय होती. मोठेपणी माणसं *वाचायचीही* सवय लागली. उदाहरणच द्यायचं झालं, तर आपण सगळे फोनवर बोलताना वेगवेगळ्या पद्धतीने बोलतो. त्या पद्धतींचं निरीक्षण करून मी ते सादर करते किंवा एखाद्याची विशिष्ट लकब असते, सवय असते. ती मी लक्षात ठेवते. त्याचा मला माझ्या कार्यक्रमात खूप उपयोग होतो. वाचनही खूप करते. त्यातून विनोद, चुटकुले जमवते.'

चैतालीला आवाजाचीही काळजी घ्यावी लागते. आवडतं म्हणून आइस्क्रीम भरपूर खाल्लं असं करून चालत नाही. तसंच कार्यक्रमापूर्वी तास-दोन तास मौन पाळण्याचं पथ्यही ती पाळते.

कार्यक्रम शिस्तबद्ध कसा करायचा, याचं मार्गदर्शन चैतालीला तिच्या आई-वडिलांकडून मिळालं. प्रत्येक भूमिकेत स्वतंत्र ठसा उमटवणारे दिलीप प्रभावळकर आणि आमिर खान तिचे आदर्श आहेत. अतुल परचुरे आणि सुदेश भोसले यांनी प्रोत्साहन दिल्याचंही ती आवर्जून सांगते. यापुढचा काळ तिच्यासाठी खूप महत्त्वाचा आहे. कारण *गेम शो* आणि *कार्यशाळा* या दोन गोष्टींवर ती अधिक लक्ष केंद्रित करणार आहे.

'मनोरंजनाच्या क्षेत्रात मुलींना खूप संधी आहे. पण त्यासाठी घरातल्या प्रोत्साहनाची आवश्यकता आहे. कधीकधी नातेवाईक दडपण आणतात. आजूबाजूचे लोक भीती घालतात. ते योग्य नाही. साताऱ्यासारख्या छोट्या शहरात राहून मी हे धाडस केलं, मग मोठ्या शहरातल्या मुलींना ते का करता येऊ नये?' असा सवाल चैताली करते.

चौकटीबाहेरचा विचार करणारी आणि तो प्रत्यक्षात आणण्यासाठी जीवतोड मेहनत करणारी चैताली एका वेगळ्या वाटेने चालत आहे. तिच्या धाडसामुळे ही वेगळी वाट इतर मुलींसाठी आश्वासक बनली आहे. *